|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौ उमवि/६/प्र.पा./पात्रता पडताळणी/१८ /२०२१ दिनांक :- १७ फेब्रुवारी,२०२१

प्रति,
मा.प्राचार्य / प्राचार्या,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये यांना.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान व प्रथम वर्ष बी.व्होक या अभ्यासक्रमांना प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता करणे बाबत.

**महोदय / महोदया,**

आपणास विदितच आहे की, कोरोना (Covid-१९) चा प्रादुर्भाव असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने २३ मार्च २०२० पासून २८ फेब्रुवारी,२०२१ पर्यंत टाळेबंदी / संचारबंदी घोषीत केलेली आहे. या परीस्थितीमुळे कोरोना (Covid-१९) च्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था / महाविद्यालये सध्या बंद आहेत. कोरोना (Covid-१९) चा प्रादुर्भावामुळे गेल्या नऊ / दहा महिन्यापासून सर्व शैक्षणिक संस्था / महाविद्यालये बंद असल्यामुळे महाविद्यालये स्तरावरील कामकाज नियमित सुरळीतपणे सुरु झालेले दिसून येत नाही.

मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान व प्रथम वर्ष बी.व्होक या वर्गांमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेची पडताळणी विद्यापीठात करण्यात आली होती. आता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान व प्रथम वर्ष बी.व्होक या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भातील पडताळणीची कार्यवाही महाविद्यालय स्तरावर झालेली असेलच. कोरोना (Covid-१९) चा प्रादुर्भावामुळे या वर्षी पात्रता पडताळणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला नाही.

यासंदर्भात प्राप्त झालेल्या आदेशावरुन आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान व प्रथम वर्ष बी.व्होक या वर्गांमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रता पडताळणीची कार्यवाही महाविद्यालय स्तरावर करुन सोबत जोडलेल्या नमूना प्रमाणपत्र / हमीपत्र महाविद्यालयाच्या लेटरहेडवर मा.प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सादर करावे. त्या प्रमाणपत्रासोबत १) शैक्षणिक पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी, २) इतर विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांची यादी व मायग्रेशन सर्टिफीकेट व ३) त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी व काय त्रुटी बाकी आहे त्या कागदपत्रांचा उल्लेख इ. कागदपत्रांच्या स्वतंत्र वर्ग व विद्याशाखे निहाय फाईल्स प्रवेश पात्रता विभागात दिनांक २७/०२/२०२१ पर्यत सादर करावे. त्यानंतरच प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येईल. जर विद्यार्थ्यांचे निकाल पात्रते अभावी राखीव राहिले तर विद्यापीठ त्यास जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तरी आपण या संदर्भात वैयक्तिक लक्ष घालून संबंधीतांना वरील कार्यवाहीबाबत सूचना देवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

आपली विश्वासू,

सहा.कुलसचिव
अभ्यासमंडळ / प्रवेश व पात्रता विभाग

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतरी पेटवू ज्ञानज्योत जळगाव-४२५००१

प्रत माहिती व कार्यवाहीवाहीसाठी :-

१) मा.कुलगुरु कार्यालय,कबचौ उमवि.,जळगांव
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौ उमवि.,जळगांव
३) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उमवि.,जळगांव
४) समन्वय, ई- सुविधा कक्ष,कबचौ उमवि.,जळगांव

☎:- (९१) ०२५७ - २२५७२९२, २२५७४०८, २२५७२९७, वेबसाईट :- www.nmu.ac.in, ई-मेल :- registrar@nmu.ac.in
फॅक्स क्रं: (९१) ०२५७- २२५८४०३,४०६ प्रवेश पात्रता विभाग, पत्र पेटी क्रं. ८०, क.ब.चौधरी उमविनगर, जळगांव -४२५००१

## प्रमाणपत्र / हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आमच्या महाविद्यालयात / परिसंस्थेत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रकांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा मुळ दाखल्याची महाविद्यालयाकडून खात्री करण्यात आली असून, सोबत जोडलेल्या यादीतील सर्व विद्यार्थी युजीसीने मान्यता दिलेल्या विद्यापीठांतील / शासन मान्य बोर्डातील तसेच सर्व विद्यार्थी आपल्या विद्यापीठाच्या शैक्षणिक पात्रता नियमानुसार त्या त्या वर्गाच्या प्रवेशास पात्र आहेत, प्रवेशित विद्यार्थ्यापैकी कुणालाही अपुर्ण कागदपत्रांवर / कलर झेरॉक्सवर प्रवेश दिलेला नाही. तसेच सर्व प्रवेश महाविद्यालयाने नेमलेल्या प्रवेश समिती मार्फत झालेले आहेत. आमच्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान, प्रथम वर्ष बी.व्होक या वर्गात प्रवेशित विद्यार्थी त्या त्या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र आहे. त्यामुळे आमच्या महाविद्यालयात शै.वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष कला,वाणिज्य व विज्ञान, प्रथम वर्ष बी.व्होक या वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता करुन मिळावी. यात काही तफावत आढळल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य म्हणून माझी व माझ्या महाविद्यालयाची राहील.

स्थळ :-

दिनांक :-

मा.प्राचार्य,

स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का

सोबत :- १) शैक्षणिक पात्र विद्यार्थ्यांची यादी.

२) इतर विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांची यादी व मायग्रेशन सर्टिफीकेट

३) त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी व काय त्रुटी आहे त्याकागदपत्रांचा उल्लेख